हर नगर ग्राम में
दीप से दीप जलाएंगे।

Regd No.
F/11564/Pune

# राष्ट्रीय सर्वांगीण ग्रामविकास संस्था

शिक्षण-संस्कार-आरोग्य-कृषी-स्वावलंबन आधारित ग्रामविकास

www.mulshigramvikas.org

**वार्षिक अहवाल**
**२०१४-२०१५**

## होय..
## आम्ही आत्मविश्वासाने हे करु शकतो
## एवढी हिम्मत 'शाळेनं' दिली...



## हिम्मत शाळा, निलेश दातार





**होय.. आम्ही आत्मविश्वासाने हे करु शकतो एवढी हिम्मत 'शाळेनं' दिली...**

८वी पर्यंत विद्यार्थ्यांना नापास करायचे नाही या शासकीय धोरणामुळे इ. ९वी पर्यंत ढकलत नेलेले विद्यार्थी अभ्यासात मागे पडतात. काही विद्यार्थी अर्ध्यातून शाळा सोडतात, चुकीच्या मार्गाने जाताना दिसतात. मुळशी तालुक्यात हे प्रमाण १०% दिसते. अशा विदयार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणून त्यांना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी संस्थेने **'सन २०१२ मध्ये हिम्मतशाळा'** नावाने इ. १०वी चा वर्ग सुरु केला.

२०१२ साली इ. १०-१२ वी नापास व अन्य ६ अश्या एकूण १२ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. यातील सर्व विद्यार्थ्यांना मोबाईल रिपेअरिंग व विद्युत दुरुस्तीचे अल्प कालावधीचे व्यवसाय अभ्यासक्रम शिकवले. सर्व मुले उत्तीर्ण झाली व बहुतेक सर्व मुले व्यवसाय अभ्यासक्रमामुळे स्वतःच्या पायावर उभी राहिली. अपयशी विद्यार्थ्यांमध्ये झालेला हा बदल लोकमतच्या ऑक्सीजन पुरवणीने तसेच TV9, ABP माझा या प्रसार माध्यमांनी घेतला. त्याचा परिणाम म्हणून सन २०१३-१४ च्या बॅचसाठी ५ राज्यांमधील (राजस्थान, गोवा, बिहार, मेघालय व महाराष्ट्र) विविध भाषा व विविध माध्यमांच्या १८ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. १४ विद्यार्थी वार्षिक परिक्षेस बसले ११ उत्तीर्ण झाले. ते व्यावसायिक अभ्यासक्रमाचे शिक्षण घेत आहेत. याच बॅचमधील **तुषार उबाळे हा कल्याण येथील विद्यार्थी सलग ३ वेळा १० वीत अपयशी झाल्यानंतर हिम्मतशाळेत प्रवेश घेऊन रहायला आला.** अभ्यासात हुशार व शांत स्वभावाचा तुषार त्याच्या पूर्वीच्या शाळेत कसा काय नापास झाला होता कळले नाही. **वार्षिक परिक्षेत तुषारने ७६% गुण मिळविले** व आता तो नाशिक येथे इलेक्ट्रीकल डिप्लोमाचा अभ्यासक्रम पूर्ण करत आहे. तीन वर्षे सलग नापास होऊन हिम्मत शाळेत प्राविण्य गुण होऊन पास होणाऱ्या तुषारला त्याच्या पास होण्याचे रहस्य विचारले असता तो म्हणतो, हिम्मत शाळेने मला अभ्यास कसा करायचा याचे तंत्र शिकवल्यानेच मी पास होऊ शकलो.

हिम्मतशाळेचा पुढील वाटचालीचा आलेख चढता राहिला. सन २०१४-१५ मध्ये एकूण १७ गावातून ३७ विद्यार्थ्यांनी मराठी माध्यमातून १०वी साठी प्रवेश घेतला. यापैकी ३२ विद्यार्थ्यांनी वार्षिक परिक्षा दिली व २१ मुले पास झाली. पहिला क्रमांक ६४% (उजमा अन्सारी). ३ मुलांना ६०% पेक्षा जास्त गुण मिळाले. त्याचबरोबर केंद्रशासन प्रस्तुत ३ महीने कालावधीचा इलेक्ट्रीकल ची तोंडओळख हा पुणे विद्यार्थिगृहाचा अभ्यासक्रमही पूर्ण केला आहे.



अभ्यासक्रम शिकविण्यासाठी संस्थेने तीन पूर्ण वेळ कार्यकर्त्यांची नियुक्ती केली असून पुणे शहरातील निवृत्त शिक्षक दंडगव्हाळ सर, मुळे सर, सौ. शुभदा जोशी, अनंत चोपडे व स्वतः अनिलजी व्यास, यांच्या गणित, विज्ञान व इंग्रजी विषयाच्या अध्यापनामुळे मुलांना अभ्यासात रुची निर्माण होऊन अभ्यास सुकर होताना दिसतो.

**यावर्षीचे उपक्रम :**





**शालेय शिक्षण :** पालकसभा व आठवड्यात लेखी परिक्षा (घटक चाचणी), डिसेंबर अखेरपर्यंत अभ्यासक्रम पूर्ण करुन उजळणी / सराव परिक्षाद्वारे आत्मविश्वासात वाढ, क्षमतेनुसार अभ्यास करावा म्हणून गटात विभागणी, सामूहिक अभ्यास व अडचणी सोडवण्यावर भर. नापास होतील अशा विद्यार्थ्यांसाठी जास्तीचे शिकवणी वर्ग, तोंडी उजळणी.

**व्यवसाय प्रशिक्षण :** सेंद्रीय शेती व गो आधारित खत कीड नियंत्रक व इलेक्ट्रिकल प्रशिक्षण

**क्षमता विकास :** मतीमंद शाळेत क्रिडा स्पर्धेचे आयोजनाचा अनुभव, गुरुपोर्णिमेनिमित्त भाषण, शिक्षकदिनानिमित्त शिकवण्याचा अनुभव, मैदानी खेळांचे प्रशिक्षण

**सामाजिक जाणीव निर्मिती :** रक्षाबंधन विजयादशमी, मकरसंक्रमण, गणेशोत्सव, विजय दिन, जोर स्पर्धा, अशा कार्यक्रमातून सामाजिक जाणीव निर्मितीचे प्रयत्न.

**शाळेची वैशिष्ट्ये :** स्वावलंबन, अनुशासन व संस्कारांवर भर. श्रमप्रतिष्ठेचे मूल्य प्रस्थापणे.

## स्वामी विवेकानंद विद्यालय, आसदे **सतीश शिंदे**

एकूण पटसंख्या २४८ (मुली ११४) इ. १० वी चा निकाल १००%. ८९.४% गुण मिळवून रोहित मेंगडेचा प्रथम क्रमांक. ७मुलांना ८०% पेक्षा जास्त गुण मिळाले

विद्यार्थ्यांचा विविध स्पर्धा परिक्षांमध्ये सहभागः एन. टी. एस. - ८, एन. एम. एस. एस. - १०, ७वी शिष्यवृत्ती - १२ विद्यार्थी. चित्रकला प्राथमिक परिक्षेस १६ विद्यार्थ्यां पैकी १३ विद्यार्थी तर माध्यमिक परिक्षेस १५ पैकी १३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

शालेय स्तरावर वक्तृत्व, निबंध, रांगोळी, चित्रकला, हस्ताक्षर, सामान्य ज्ञान, पद्यपाठांतर, संस्कृती ज्ञान स्पर्धा घेण्यात आल्या.





**तालुका क्रीडास्पर्धाः** कबड्डी - १६ - १७ वर्षे वयोगटाच्या मुलींच्या संघाचा द्वितीय क्रमांक. खो-खो - १४ वर्षे वयोगटातील - मुले व मुलींच्या दोन्ही संघाचा तृतीय क्रमांक. धावणे - १४ वर्षे गटात मुली रिलेमध्ये प्रथम क्रमांक. १७ - १९ वर्षे वयोगटात रिलेमध्ये मुलांचा प्रथम क्रमांक.

**वैयक्तिक स्पर्धा -** मुले - १०० मीटर मध्ये प्रथम, ३००० मीटर मध्ये प्रथम व द्वितीय क्रमांक. मुली - १५०० व ६०० मीटरमध्ये प्रथम, ४०० व २०० मीटरमध्ये द्वितीय क्रमांक.

**सांस्कृतिक कार्यक्रम -** भोंडला, वनभोजन, जागतिक महिला दिन, सावित्रीबाई फुले जयंती, शिक्षक दिन, मा. पंतप्रधानाचे दूरदर्शन वरील मन की बात ऐकणे, स्वामी







विवेकानंद जयंती, महात्मा गांधी जयंती सप्ताह, शरद मल्हार तालुकास्तरीय स्पर्धेत सहभाग.

**विशेष उपक्रम** - क्रीडा पत्रकार संजय दुधाणे यांच्या पुढाकाराने धनुर्विद्या प्रात्यक्षिक. ज्ञानप्रबोधिनीच्या वतीने सात दिवसांचे विद्याव्रत संस्कार शिबिर, तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय Inspire Award विज्ञान प्रदर्शनात सहभाग. वार्षिक स्नेह संमेलन. ६ गावांमधून सशस्त्र सेना छात्रनिधी ११९९८ रुपये जमा करण्यात आला.

श्री. अभय रबडे मित्रपरिवारातर्फे गरजूंना ५०० वह्यांचे वाटप करण्यात आले. साधना व्हिलेज तर्फे २५० विद्यार्थ्यांना डाबर च्यवनप्राश देण्यात आले.

राणी लक्ष्मीबाई सैनिकी शाळेतर्फे २५ विद्यार्थिनींची सूर्यनमस्कार स्पर्धा घेण्यात आली. कर्वे शिक्षण संस्थेतर्फे आयोजित सातत्यपूर्ण सर्वंकष मुल्यमापनाच्या प्रशिक्षणासाठी चार शिक्षक सहभागी झाले. **पंचवटी ज्येष्ठ नागरिक संघाच्या** माध्यमातून नियमित धान्यदान, सौ मंगलाताई नारळीकर व श्रीमती निर्मलाताई सांब यांच्या ४ सहकारी शिक्षिकांनी महिन्यातून १ दिवस येऊन सर्व वर्गांना आनंददायी शिक्षण दिले. विज्ञानवाहिनी - पुणे विद्यापीठ - यांनी शाळेस भेट देऊन विविध विज्ञान प्रयोग नाटिकेद्वारे दाखविले. ६०विद्यार्थ्यांना विज्ञानाचे कीट भेट देण्यात आले.

श्री. एम. डी. देशपांडे यांचे उपक्रम - श्री सदानंद काळे यांचे ‘विमान बनवा विमान उडवा’ कार्यक्रम, ९वी - १०वी च्या विद्यार्थ्यांना बँकींग क्षेत्राची माहिती. ७ वी साठी पर्यावरण पूरक गणेसोत्सव, ८वी साठी रांगोळीतून गणेश प्रतिकृती, Craft चे प्रात्यक्षिक, इ. ९ वी English Word Building, ६वी साठी म्हणी व त्यांचा वापर, Origami कला असे अनेक उपक्रम वर्षभर घेण्यात आले. त्यांच्याकडून वसतिगृहातील मुलींना स्वेटर्स, वसतिगृहांना Water Filter, शाळेसाठी Sound System, स्फूर्ती गीताच्या कॅसेट्स शिक्षकांनी आवर्जून वाचावेत असे काही लेख व विद्यार्थ्यांना बक्षिसे देण्यात आली.

शाळेच्या गुणवत्तेमध्ये वाढ व्हावी म्हणून सौ. पूनम मेहता यांच्या पुढाकाराने श्री मोहनराव कुलकर्णी आणि सौ. भाग्यश्री चिटणीस दर आठवड्याला शाळेस भेट देऊन सर्व शिक्षक आणि इतर कर्मचारी यांच्या कामात सुसूत्रता यावी यासाठी प्रयत्न करत आहेत.

यावर्षी शाळेचे नुतनीकरण (बांधकाम) सुरु आहे.

**या वर्षभरात एच.एस.बी.सी., रिलाएन्स कॅपिटल (प्रयोगशाळा खर्च), वझे कुटुंबीय, मराठे, जानकी शैक्षणीक संस्था, केपीआयटी कमिन्स, दत्तोपंत म्हसकर ट्रस्ट, रोटरी क्लब शनिवारवाडा, सुतारवाडी ज्येष्ठ नागरिक संघ या सारख्या व्यक्ती व संस्थाचे विशेष आर्थिक व तज्ञ सहकार्य मिळाले. बिपीन काबरा यांनी मुंबईतून चांगल्यापद्धतीने निधी संकलन केले.**

## आय. बी टी विभाग - वसंत बोराडे





८वी- ९वी १०वीच्या विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी, - उर्जा पर्यावरण, कृषी - पशुपालन व गृह आरोग्य या विषयांचे व्यावसायीक प्रात्यक्षिक आधारित प्रशिक्षण दिले जाते. विषयशः झालेले उपक्रम.

**अभियांत्रीकी** - २५ पदके; तीन ठिकाणी दिली उत्पन्न १२५० /- पाण्याच्या टाकीसाठी कट्टा करणे मंदिरांना दरवाजे बसवणे, नळ जोडणी करुन देणे, ८ बाकांची दुरुस्ती; स्टूल तयार करणे २ वर्गांची दुरुस्ती, वेल्डींग करणे व मशीन वर काम करण्याचा चांगला अनुभव मुलांना मिळाला.

**उर्जा - पर्यावरण** - १०वी च्या मुलांनी संगणक खोलीचे वायरिंग केले. ध्वनी व्यवस्था दुरुस्त केली. २ मुलांनी सौर दिवे तयार करुन ८वीच्या वर्गात बसवले.

**कृषी - पशुपालन** - गुलमोहर - अशोक वृक्ष लागवड, जीवामृत-दशपर्णी अर्क प्रात्यक्षिक; अझोला मार्गदर्शन गादी वाफे तयार करुन विक्रीतून १९०/-रु प्राप्ती झाली.

**गृह - आरोग्य** - गॅस मिळल्यामुळे गृह उद्योगाचा चिकी, वडे, नान कटाई, अश्या अनेक वस्तूंची निर्मिती व विक्रीची कामे करण्यात आली. कागदी पाकीटे तयार करणे, शिवण कला बँक व्यवहार शिकवणे, ७० मुलांचे रक्तगट हिमोग्लोबीन तपासणी असे विषय पूर्ण करण्यात आले.

## बालवाडी - सौ. विद्या देशपांडे



चौथे वर्ष, ३-६ वयोगटातील एकूण २९ मुलांचा सहभाग

विविध उपक्रम - पालखी - दिंडी, नागपंचमी निमित्त मातीचे नाग बनविणे, रक्षाबंधन, गणेशोत्सव, २ वेळा पालक मेळावा, स्वतंत्र दिन, नवरात्रीत भोंडला, सारसबाग व स्वरुपवर्धिनीची सहल, गणतंत्र दिनानिमित्त प्रभात फेरी, खेळ स्पर्धा, स्नेहसंनेलन, शाळेच्या शेवटच्या दिवशी जेवण असे विविध उपक्रम घेण्यात आले.

श्री मोहन कुलकर्णी, भाग्यश्री चिटणीस, भाई उपाळे अशी अंदाजे २५ ते ३० कार्यकर्ते व सहानुभूतीदार व्यक्तींनी बालवाडीस भेट दिली.



## वसतीगृह

माले वसतीगृहात - इ.१ली. ते ७वी पर्यंतची ५ मुले व आय. टी. आयची ४ अशी ९, शिळेश्वर मुलाच्या वसतीगृहात - १४ मुल व मुलींचे वसतीगृहात १९ मुलींनी प्रवेश घेतला. सुतारवाडी हिम्मत शाळेत निवासी ५ मुले निवासी होती. चार वसतीगृहात एकूण संख्या - ४७. १०वी च्या मुलांचा निरोप समारंभ मुलींच्या वसतिगृहावर झाला. अनेक उपक्रमात विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

## संस्कार वर्ग - सचीन आकरे

संस्कार वर्गाचे हे सातवे वर्ष. यावर्षी पौड कातकरी वस्ती व शिंदेवाडी येथे दैनिक गडदावणे, सहकार नगर, भैरवनाथ नगर व असदे यागावी साप्ताहिक असे ६ संस्कार वर्ग.

शिंदेवाडी संस्कार वर्गातील जोर स्पर्धेत प्रणव पाठकने प्रथम व ऋषिकेश कदम याने द्वितीय क्रमांक पटकावला. शिंदेवाडी संस्कार वर्गातील ८ मुले व १९ मुली अखिल भारतीय ''बालसाहित्य संमेलन'' मांरुजी येथे गेले होते. व दोन विद्यार्थ्यांनी स्वतः कविता तयार करुन सादर केल्या.

सर्व संस्कार वर्गाचे वार्षिक स्नेह संमेलन शिंदे वाडीत घेण्यात आले १०० विद्यार्थी व १५० पालक उपस्थित होते. एकूण ३७०० रु. बक्षीस व खाऊ वाटपासाठी ग्रामस्थांकडून जमा झाले.

५ शाळात १८२ रोपे लावणे, शालेय साहित्य वाटप, शिंदेवाडी-कासार आंबोली शाळेत गणवेश वाटप, असे अनेक उपक्रम झाले.

**पिरंगुट पोलिसांनी खाऊ वाटपात योगदान दिले** त्याचप्रमाणे विविध शिक्षक वृंद, दुकानदार, सहानुभूतीदार व पुणेकर मंडळींनी अर्थ सहाय्य उपलब्ध करुन दिले.

संस्थेचे १८ कार्यकर्ते व अनेक सहानुभूतीदार पुणेकरांनी विविध संस्कार वर्गास भेटी दिल्या.

| संस्कार वर्ग | उपक्रम | सरासरी उपस्थिती |
|---|---|---|
| शिंदेवाडी | ग्रंथ दिंडी, इंग्रजी, रांगोळी प्रशिक्षण | २२ |
| गडदावणे | मंदिर व ग्राम स्वच्छता, रक्षाबंधन | १५ |
| पौड कातकरी वस्ती | सूर्य नमस्कार, स्वच्छता | ३५ |
| असदे | खेळ स्पर्धा, मंदिर स्वच्छता, वृक्ष लागवड | २७ |
| भैरवनाथ नगर | पालखी, दिंडी, गणेश चतुर्थी, भोंडला | १३ |
| सहकार नगर | रक्षाबंधन, शालेय साहित्य वाटप, पाढे पाठांतर | ३३ |
| स्पर्धा परिक्षा केंद्र - १ ऑगस्टे रोजी सुरुवात. ३२ मुलांचा सहभाग | | १६५ |







**स्पर्धा परिक्षा केद्र -** १ ऑगस्ट १४ रोजी, पिरंगुट येथे उद्‌घाटन ७ ने सुरु होऊन २९ पर्यंत विद्यार्थी संख्येत वाढ. अभ्यासिका व स्पर्धा परिक्षा केंद्र असे स्वरुप करण्यात आले. वर्षभरात परिक्षेस बसलेले विद्यार्थी - केंद्र पूर्व परिक्षा - २३-८-१४ - ३, एम.पी.एस.सी. (राज्य) - पूर्व परिक्षा, ५-४-१५ - ७, विक्री कर स्पर्धा ११-२-१५ - १५, पत्राद्वारे २२ मार्च १५ - ३. पैकी पृथा बॅनर्जी केंद्र - पूर्व परिक्षा उत्तीर्ण झाली.

**विविध उपक्रम आयोजन व सहभाग** - १ ऑगस्ट अनौपचारिक व १४ सप्टेंबर रोजी मोहन शेटे यांच्या हस्ते औपचारिक उद्‌घाटन, २० नोव्हेंबर मनोज गोखले यांचे मार्गदर्शन, १३ डिसेंबर प्रसार भारतीय आय बीत नियुक्त सुदाम बटुले यांचे मार्गदर्शन, १६ डिसेंबर विजय दिन, २७ डिसेबर महाविद्यालयात व्याख्यान, ५ जानेवारी डॉ. वैभव खाखी यांचे मार्गदर्शन, नियमित गटचर्चा, १२ जानेवारी युवक दिन कार्यक्रम, १९ फेब्रुवारी प्रश्न मंजूषा, १९ मार्च निलूताई गवाणकर यांचा निरोप समारंभ.

## महिला विभाग -स्वाती कदम



२१ गावामधून ६० बचत गट. १० गटांनी आपल्या गटाची पुनर्रचना केली काही गट बंद झाले परंतु १७ नवीन गट सुरु झाले. १० गट साप्ताहिक बैठक घेतात. एकूण १९ गटांना एक लाख ६५ हजार कर्ज बँकेकडून मिळाले.

शेरे येथे अहिल्याबाई होळकर पुण्यतिथी व सावित्रीबाई फुले जयंती, पौड येथे जिजाऊ जयंती, सुतारवाडी केंद्रावर महिला दिन, भुकूम येथे हळदी कुंकू समारंभ, १५ महिला व मुलींना कागदाचे दागिने बनविण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. यातून अनेक मुली महिलांनी उत्पादन व विक्री केली आहे.

विक्री यंत्रणा – शैलेश सभागृह, २ स्टॉल भीमथडी जत्रेत एक बॅग स्टॉल, सावित्री महोत्सवात २ स्टॉल लावले एकूण उलाढाल ५८००० रु.

**स्वातीताईंची माले ग्राम पंचायतीत प्रेरिका व तालुक्यात प्रशिक्षिका म्हणून निवड झाली** असून त्यांनी वर्षभरात २२ गटांना दशसूत्रीचे प्रशिक्षण दिले आहे.

## शेती विभाग - प्रशांत पाटील



रावडे, खुबवली, आसदे, शिळेश्वर, जामगाव व माले या एकूण ६ गावातून ३५ शेतकऱ्यांनी चतु:सुत्री पद्धतीने भातलागवड केली. शिवाजी भरम व कैलास काळोखे यांना २० गुंठ्यामध्ये २५ पोती भाताचे उत्पादन मिळाले. २ गावातून एकूण १७ एकर एक डोळा पद्धतीने उसाची लागवड केली. हेमंत भरम यांनी एकट्याने ७ एकर एक डोळा पद्धतीने उसाची लागवड करुन ठिबक सिंचन केले.

६ गावांमधून ४५० फळझाडे लावण्यात आली (आंबा, चिकू, नारळ, जांभूळ) ८ शेतकऱ्यांनी दशपर्णी अर्क, १० शेतकऱ्यांनी पाभर यंत्राने पेरणी केली. एका शेतकऱ्याने मलचिंग पेपर टाकून ठिबक सिंचनावर खरबूज लागवड केली व त्याला जीवामृत वापरले. प्रत्येक गावातील १० शेतकऱ्यांना प्रत्येकी ५ फळझाडांची रोपे वाटप करण्यात आली.

वर्षभरात एकूण ६ गावातून ६० शेतकऱ्याबरोबर विविध शेतीप्रयोगाच्या माध्यमाने संपर्क झाला व शेतीविषयक सी.डी. दाखवण्यात आली.



## मराठवाडा विकसन प्रकल्प - जयंत पाटील

बीड व धाराशीव जिल्हयात दोन कार्यकर्त्यांनी २०१२ च्या ऑक्टोबर पासून प्रत्यक्ष प्रवासास सुरुवात. संस्थेने २०१३ ऑक्टोबर पासून हा प्रकल्प राबवण्याचा निर्णय घेतला. गेल्या वर्षभरात धाराशिवच्या व बीडच्या ९ तालुक्यात संपर्क प्रस्थापित झाला असून प्रत्यक्ष शेती मेळावे, गावशः बैठकांच्या माध्यमातून सेंद्रीय शेतीचे प्रयोग शिकवण्यावर भर देण्यात येत आहे.

ऑगस्ट २०१४ पासून जिल्ह्यासाठी एक पूर्ण वेळ कार्यकर्ता नेमून गावोगावी संपर्क वाढवणे, शेती प्रयोगास प्रोत्साहन देणे, आधुनिक तंत्राने शेती करणाऱ्या प्रयोगशील शेतकऱ्यांची माहिती संकलित व प्रसृत करणे, महाविद्यालयांशी संपर्क, असे अनेक विषय सुरु करण्यात आले आहेत. धाराशीव

जिल्हयातील प्रत्येक तालुक्यातील एका महाविद्यालयात संपर्क प्रस्थापित झाला आहे. नळदुर्ग व धाराशीव मधील महाविद्यालयांच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबीरात सक्रीय सहभाग राहीला. यावर्षी महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यावर विशेष प्रयत्न करुन त्यांना स्थानिक ठिकाणीच रोजगार निर्मितीकडे वळवण्यासाठी प्रवृत्त करण्याचा विचार आहे.

लोहारा तालुक्यातील हराळी गावी ज्ञान प्रबोधिनी शाळेत शेती मेळावा घेण्यात आला. २३ गावातून ४७ शेतकरी उपस्थित होते. पाठपुरावा करण्याच्या निमित्ताने त्यापैकी आठ गावात शेतकरी बैठकाही घेण्यात आल्या. परिणाम स्वरुप यावर्षी धाराशीव जिल्ह्यात ३० गावात १५० शेतकऱ्यांच्या शेतीत विना खर्चिक शेती प्रयोग व्हावेत असे नियोजन होत आहे. स्वयंसेवी पध्दतीने २-३ गावात शेती प्रयोग करवून घेणार १०-१२ कार्यकर्ते संस्थेस जोडले गेले आहेत. अरळी बु. गावात शिवजयंती निमित्त श्री. रमाकांत कुलकर्णी यांचे ''रयतेचा राजा- शिव छत्रपती'' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. पशूवैद्य डॉ. रामकृष्ण बापट यांनी ४ गावात गुरांचे व्यवस्थापन यावर मार्गदर्शन केले. शेतकरी आत्महत्यांवर आधारित 'बळीराजा धीर धर' हे पथनाटय काही शिबीरे व महाविद्यालयात करुन जन जागृती करण्यात आली. महाविद्यालयात निबंध स्पर्धा घेण्यात आली.

यावर्षी मोठ्या प्रमाणावर आत्महत्या झाल्या. त्यापैकी १५% आत्महत्याग्रस्त कुटुंबांशी प्रत्यक्ष संपर्क साधून त्यांच्या अडचणी समजावून घेण्यात आल्या व आवश्यक त्या पूरक व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. त्यानिमित्त तेथील ग्रामस्थांना एकत्र करुन काही विषयंही सुचवले आहे. गेल्या वर्षात बीड व धाराशिव जिल्हयात अवकाळी पाऊस व अवर्षणामुळे नळदुर्ग-अणदूर परिसरातील शेतकऱ्याची सहल बीड मधील लोळद गावी नेण्यात आली.

**अन्य उपक्रम** - सज्जनगड सहल, जोर स्पर्धा, गणेशोत्सवांचे परिक्षण व त्यातून सामाजिक भान निर्माण करण्याचा प्रयत्न, माळीण दुर्घटनेत योगदान, एच. एस. बीसी च्या सहाय्याने रस्त्यावरील २० सौर दिवे बसवणे, निर्धुर चुलींचे ४ गावात वाटप, इमरसनच्या साहाय्याने २५ कातकरी वस्त्यात कपडे वाटप, सेवा सहयोगच्या माध्यमातून १३० मुलांना शालेय साहित्य वितरण, दत्तोपंत म्हसकर ट्रस्टच्या वतीने २ कातकरी वस्त्यात दिवाळी भेट, के. पी. आय. टी. च्या माध्यमातून किशार वैद्यानिक प्रकल्प ३ शाळात राबवला व वसतीगृहासाठी धान्य संकलन.





हर नगर ग्राम में
दीप से दीप जलाएंगे।


## राष्ट्रीय सर्वांगीण ग्रामविकास संस्था

गट क्र. २९७, प्लॉट क्र. २२ अ, दत्त मंदिराजवळ, अंबडवेट, ता. मुळशी, जि. पुणे ४१२ १०८. (भारत)
भ्रमणध्वनी : प्रदीप पाटील ७३८७५ ४३४७८. ईमेल : mail4rsgs@gmail.com **www.mulshigramvikas.org**

संपर्क : **अनिल व्यास** ८८८८८७१३१०, **सौ. पूनम मेहता** ९४२२० ८८६८४, **रवींद्र देव** ९८२२० ९८०५३, **प्रदीप कुलकर्णी** ९८५०८ ८६०६४.